पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे
मुख्य कचेरी : ४ ब, बी.जे. रोड, पुणे - ४११००१.
PDCC BANK ✻ पो. बॉक्स नं.१०९ ✻ दुरध्वनी क्र.: २६१३३८३३, २६१३९३००. ई-मेल: ho@pdccbank.com

# ✻ सुचना ✻

| | |
|---|---|
| Step - 1 | ➢ पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या लेखनिक पदाच्या सरळसेवा भरती प्रक्रियेसाठी दि. ०७.०८.२०२१ ते दि. १७.०८.२०२१ या कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल केलेल्या पात्र उमेदवारांची यादी बँकेच्या संकेतस्थळावरती (https://pdccbank.co.in/careers) प्रसिध्द करण्यात आलेली आहे.<br>➢ बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेच्या यादीमध्ये पात्र उमेदवारांचे नाव नसल्यास अशा उमेदवारांनी support@pdccbank.com या ई–मेल आय.डी.वर दि. १९.०५.२०२५ ते दि. ०५.०६.२०२५ या कालावधीत आक्षेप नोंदविणे आवश्यक आहे. आक्षेपमध्ये स्वतःचे रजिस्टर क्रमांक (युजर आय.डी.), पुर्ण नाव, जन्मदिनांक, परिक्षा शुल्क जमा केल्याचे चलन/परीक्षा शुल्क भरलेली शाखेचे नाव व आधारकार्ड अपलोड करणे अनिवार्य आहे. |
| Step - 2 | ➢ बँकेच्या लेखनिक सरळसेवा भरती प्रक्रियेसाठी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना त्यांच्या रजिस्टर ई–मेल आय.डी.वर लिंक सोमवार, दि. १९.०५.२०२५ रोजी पाठविण्यात येईल. सदर लिंकद्वारे उमेदवारांना आपला पासवर्ड नव्याने अद्ययावत करणे अनिवार्य आहे.<br>➢ उमेदवारांनी पासवर्ड अद्ययावत करून लॉगिन करावे व लॉगिन पुर्ण झाल्यावर दिसणाऱ्या पेज वरील महत्वाचे सुचनांचे अवलोकन करावे. सदर सुचनांचे पालन करणे अनिवार्य आहे.<br>➢ ज्या उमेदवारांची Step – 2 प्रक्रिया पुर्ण झाली आहे त्यांनी Step – 3 ही प्रक्रिया पुर्ण करावयाची आवश्यकता नाही. |
| Step – 3 | ➢ ज्या उमेदवारांचा रजिस्टर ई–मेल आय.डी. व रजिस्टर मोबाईल नंबर बदललेला आहे त्यांना ई–मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक अद्ययावत करण्याची सुविधा दि. १९.०५.२०२५ ते दि. ०५.०६.२०२५ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.<br>➢ आपण अद्ययावत केलेल्या ई–मेल आय.डी. वर सरळसेवा भरती प्रक्रियेची लिंक पाठविण्यात येईल. सदर लिंकद्वारे उमेदवारांना आपला पासवर्ड नव्याने अद्ययावत करणे अनिवार्य आहे. ई–मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक एकदाच अद्ययावत करता येईल.<br>➢ उमेदवारांना ई–मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक अद्ययावत करण्यासाठी स्वतःचा रजिस्टर क्रमांक, संपुर्ण नाव, जन्मदिनांक व आधार क्रमांक ही माहिती अनिवार्य आहे.<br>➢ ज्या उमेदवारांनी ई–मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक यशस्वीरित्या अद्ययावत केले आहेत, त्यांनी अद्ययावत केलेला ई–मेल आय.डी. व मोबाईल नंबर सरळसेवा भरती प्रक्रियेसाठी ग्राह्य राहणार आहेत. |
| Step – 4 | ➢ ऑनलाईन परिक्षेचे वेळापत्रक व प्रवेशपत्र अलाहिदा बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. सदर प्रवेशपत्र स्वतःच्या लॉगिन आय.डी. मधून डाऊनलोड करावे. उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळावर भेट देऊन भरती बाबतची माहिती अवगत करून घ्यावी. |

✻✻✻